# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

ई-मेल managerrc@mahadiscom.in फोन : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स : ०२२-२४०२५७६३


मा.सं./सेप्र/फा.क्र.२३/ 026440 दिनांक :२१/०९/२०१३

21 SEP 2013

प्रति
मुख्य अभियंता(नाप),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
नागपूर परिमंडल, **नागपूर.**

विषय : अपंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक उपकरणे व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. १२८९, दिनांक १३/०१/२०१२.
२) आपले पत्र क्र. १५६४, दिनांक ११/०४/२०१२.

------

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या परिमंडलातील एकूण १२ अपंग अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी Scooter with adaption उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केलेली आहे असे आपण या कार्यालयास उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये कळविलेले आहे. त्यानुसार सदरील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप विचारात घेता सर्वश्री बाळु कवडु सातार, कनिष्ठ तंत्रज्ञ, महेंद्र हरी पाटील, कनिष्ठ तंत्रज्ञ, सि.डी. भोयर, तंत्रज्ञ या कर्मचाऱ्यांची Scooter with adaption साठी रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) इतक्या रकमेची मागणी सक्षम अधिकाऱ्यांनी मान्य केलेली आहे. ही रक्कम मंजूर करण्यापुर्वी संबंधित कर्मचाऱ्याकडून खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) कर्मचाऱ्याकडे वाहन चालविण्याचा अद्यावत नुतनीकरण केलेला परवाना असणे आवश्यक आहे.

२) कर्मचारी हा स्थायी पदावर (Regular) कार्यरत असणे आवश्यक आहे.

३) कर्मचारी विशेष वाहनभत्ता घेतो किंवा नाही, घेत असल्यास त्याला देण्यात येणारा विशेष वाहनभत्ता बंद करण्यात येईल, असे संबंधित कर्मचाऱ्याकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे.

४) कर्मचारी ५ वर्षाच्या आत राजीनामा व नोकरी सोडून गेला तर उपलब्ध करुन दिलेली रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचा संबंधित कर्मचाऱ्याकडून विकल्प (Option) लेखी स्वरुपात घेण्यात यावा.

५) Scooter with adaption उपकरणाची किंमत रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास उर्वरित रक्कम मागणीधारक कर्मचाऱ्यास वाहन आग्रीम (Vehicle Advance) या स्वरुपात मंजूर करावी व सदर वाहन आग्रीमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांकडून समान दहा हप्त्यात वसूल करावी.

६) Scooter with adaption उपकरणाच्या खरेदी संदर्भात कर्मचाऱ्याने Scooter खरेदीसाठी संबंधित एजन्सीकडून दरपत्रक घ्यावे. मात्र Adaption करीता शासनाने नियुक्त केलेल्या पुरवठादाराकडून दरपत्रक घेऊन संबंधित आस्थापनेस सादर करावे.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त कर्मचाऱ्यांनी अटींची पूर्तता केलेली असून त्यांना Scooter with adaption व वाहन अग्रीम मंजूर करण्यात आला आहे, याबाबतची माहिती या कार्यालयास त्वरीत पाठविण्यात यावी, जेणे करुन ती शासनास अवगत करणे सुलभ होईल.

निर्गमित
दिनांक 1 SEP 2013
सही ...............

(संदेश ए. हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\RC\Ltr\File-23-PHP Letter.doc